# प्रकरण - पहिले

## प्रास्ताविक

# प्रकरण = पहिले

## प्रास्ताविक

1.1 (अ) प्रस्तावना

(ब) संशोधन समस्येची पार्श्वभूमी

1) इतिहास विषयाचा जुना दृष्टीकोन

2) इतिहास विषयाचा जुना अध्यापन दृष्टीकोन

3) प्राचिन इतिहासातील दोष

4) विज्ञान युगाचा इतिहासावरील परिणाम

5) इतिहास शिक्षणाचा नवा दृष्टीकोन

6) इतिहास अध्यापनासाठी विविध पध्दतींची आवश्यकता

(क) इतिहास अध्यापनाच्या विविध पध्दती

(ड) कथाकथन पध्दती

1.2 संशोधनाची गरज

1.3 संशोधन समस्येचे शब्दांकन

1.4 संशोधन विषयाचे महत्व

1.5 संशोधनाची उद्दिदष्टे

1.6 संशोधनाचे गृहीत कृत्य

1.7 संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

1.8 संशोधन पध्दती

1.9 प्रकरणीकरण

1.10 समारोप.

# प्रकरण - पहिले

## प्रास्ताविक

### १.१ (अ) प्रस्तावनाः

कोणत्याही विषयाचे अध्यापन होताना ते शास्त्रीय दृष्टीकोनातून होणे आवश्यक आहे. प्रत्येक विषयाचे अध्यापन परिणामकारक व प्रभावीरीत्या होण्यासाठी संशोधनाद्वारे त्यातील कांही बाबींचा उलघडा झाल्यास अधिक उपयुक्त होईल., म्हणून संशोधनाचे महत्व अध्ययन अध्यापनाच्या दृष्टीकोनातून अनन्यसाधारण आहे.

> "Research is one of the most potent tools of reform in education, it enables the teachers and administrators to identify and understand educational problems to devise appropriate solutions for them and to evaluate the effectiveness of different educational programmes." 1

अभ्यासक्रमातील इतिहास हा एक अनिवार्य असा विषय आहे. या विषयाचे अध्यापनाचे बाबतीत शास्त्रीय दृष्टीकोन स्विकारला जात असल्याने इतिहासाच्या प्रभावी अध्यापनासाठी ज्या विविध अध्यापन पध्दतींचा वापर केला जातो, त्या पध्दतींचे बाबतीत प्रयोगाचा अवलंब करुन त्यातील त्रुटी, समस्या, अडचणी यांचा संशोधनाद्वारे आढावा घेतला तर ती पध्दती किती प्रमाणात योग्य आहे, कोणत्या बाबींची भर घालणे आवश्यक आहे हे अजमावता येईल व इतिहास अध्यापनात एक मौलिक भर पडेल.

म्हणून इतिहास विषयाच्या विविध पध्दतींच्या अध्यापनाचे बाबतीत प्रायोगिक संशोधन होणे आवश्यक आहे.

सहाजिकच कनिष्ठ माध्यमिक स्तरावरील इतिहास अध्यापनातील आवश्यक असणारी कथकथन पध्दती अधिक परिणामकारक होण्याच्या दृष्टीने प्रायोगिक कार्य हाती घेतले आहे. यासाठी प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रास्ताविक या संदर्भात कथाकथन पध्दती ज्या विषयाच्या अध्यापनासाठी वापरली जाते त्या इतिहास विषयाचा जुना दृष्टीकोन, जुनी शिकविण्याची पध्दती, विज्ञानयुगाचा किंवा शास्त्रीय युगाचा इतिहासावर झालेला परिणाम, त्यामुळे इतिहासाकडे पहाण्याचा निर्माण झालेला नवा दृष्टीकोन, नव्या अध्यापन पध्दती इत्यादींचा आढावा घेणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे कथाकथन पध्दती अधिक परिणामकारक होण्याची, त्याबद्दल संशोधन होण्याची गरज का आहे हे स्पष्ट होणे आवश्यक आहे आणि तसेच समस्येचे शब्दांकन, तिची उद्दिष्टे, गृहीत कृत्ये, संशोधनाची निश्चित व्याप्ती व मर्यादा इत्यादी बाबीचा उहापोह होणे आवश्यक आहे. म्हणून प्रस्तुत प्रकरणात वरील सर्व बाबींची सविस्तर माहिती दिलेली आहे.

**(ब) संशोधन समस्येची पार्श्वभूमी:**

**1) इतिहास विषयाचा जुना दृष्टीकोन:**

इतिहासाला आज जे महत्व प्राप्त झाले आहे ते पूर्वी नव्हते. शिक्षण क्षेत्रात आणि इतरत्र आज जो मान मिळत आहे तो पूर्वी मिळत नसे. इतिहास म्हणजे जुन्या कथा अशी जुनी संकल्पना होती. त्यामुळे रंजकत्वासाठी अशा कथांमधून सत्य व अद्भूत यांची बेमालूम सरमिसळ होई. पुराणाचा उगम याच कल्पनेतून झाला. पुढे आर्यकाली इतिहास म्हणजे विभूतीची चरित्रे ही कल्पना रुढ झाली. त्यातून भव्यदिव्याची प्रेरणा मिळावी ही अपेक्षा असे. राजेशाही, व सरंजामशाही यांच्या जुन्या जमान्यात इतिहास हा मुख्यत: लढाया, तह, वंशावल्या, सनावल्या, यांनी भरलेला असे. राजकुटुंब व सरंजामदार यांच्या व्यतिरिक्त इतिहासात दुसरी व्यक्ती क्वचितच आढळे. राजवाड्यातील हेवेदावे, कारस्थाने, राजांचे ऐश्वर्य व विलास या पलीकडे इतिहासकारांची दृष्टी जात नसे.

पूर्वीच्या काळी इतिहासाविषयी मोठमोठया लोकांच्या चमत्कारिक कल्पना होत्या, मतभेद होते. कांही इतिहासाचा तिरस्कार करीत, तर कांही त्याला डोक्यावर घेऊन नाचत. फ्रान्समध्ये एकदा अभ्यासक्रम तयार करण्याकरिता शाळाखात्याचे मोठमोठे अधिकारी एकत्र आले होते. कोणते विषय शिकवावेत व कोणते वगळावेत याविषयी चर्चा करतांना एकजण म्हणाला, 'शाळात इतिहास शिकविण्याचा काहीच उपयोग नाही. ज्यांना वाचता येते ते इतिहासाची पुस्तके आपापल्या घरी फुरसदीने वाचतील.' दुसरा म्हणाला, 'इतिहासाचे अध्यापन ही एक अशक्य गोष्ट आहे.' तिसऱ्याने मुक्ताफळे काढली, 'इतिहास शिकविण्यात मोठा धोका आहे, त्यामुळे मुले विनाकारण घमेंडखोर बनतील.' 2.

तसेच स्पेन्सरने इतिहासाबद्दल टीका करतांना म्हटले आहे की, 'इतिहासातील घटना मनोरंजनासाठी वाचा पण त्या घटनांनी स्वतःच्या पूर्वजांची बढाई मारणे योग्य नाही, तसेच त्यापासून कांही बोध घेणेही योग्य नाही.' 3.

ही एक बाजू झाली. विरुध्द बाजूची मतेसुध्दा अशीच एकांगी आहेत. उदाहरणार्थ क्रॉमवेल हा इंग्लंडचा एक मोठा राष्ट्रपुरुष म्हणतो की, 'इतिहासातून आपल्याला प्रत्यक्ष देवाचे दर्शन घडले. देव इतिहासामधून प्रगट होत असतो.' तर फ्रुड नावाचा नामांकित इंग्रज इतिहासकार म्हणतो की, 'इतिहास हा चिरंतन अशा नैतिक मूल्यांची घोषणा करीत असतो," आणि झिलर या जर्मन शिक्षणशास्त्रज्ञाने इतिहास या विषयाला केंद्रस्थान दिले. इतर विषयांची त्याच्या भोवती मांडणी केली. 4.

जुन्या काळी इतिहासाबद्दल इतका तीव्र मतभेद होताच, परंतु आजसुध्दा इतिहास म्हणजे काय व त्याची उद्दिष्टे कोणती याबाबत चांगल्या, सुशिक्षित, समंजस माणसाच्या मतामध्ये एकवाक्यता खास आढळणार नाही. जो तो आपल्या मनाप्रमाणे व आवडीनिवडीप्रमाणे इतिहासाची व्याख्या व त्याचे उद्दिष्ट सांगेल. म्हणजेच वेगवेगळी माणसे इतिहासाचा वेगवेगळा अर्थ लावतात आणि म्हणून त्यांच्यात मतभेद उत्पन्न होतात.

जुना इतिहास म्हणजे गद्यात किंवा पद्यात सांगितलेल्या जुन्या कथाच होत.

या कथांत त्यातील तपशील सत्य आहे किंवा नाही याचा विचारच केला गेला नाही. त्या मनोरंजक असल्या किंवा बोधप्रद असल्या म्हणजे काम भागत असे. मनोरंजक किंवा बोधप्रद होण्यासाठी त्या तथाकथित ऐतिहासिक कथांमध्ये भरपूर मालमसाला घालण्यात येत असे.

अशा ऐतिहासिक कथा आणि प्रसंग एक पिढी दुसऱ्या पिढीच्या तोंडून ऐकत असे आणि दुसऱ्या पिढीला तो वारसा तोंडीच देत असे. यामुळे शतकानुशतके हे ऐतिहासिक वाङ्मय कानाने ऐकूनच उपलब्ध होत असे. मात्र धार्मिक वाङ्मय पवित्र असल्यामुळे त्यामध्ये सहसा ढवळाढवळ होत नसे. म्हणूनच ते हजारो वर्षे लिपिनिविष्ठ नसतांना सुध्दा मूळ ढाचा न बदलता तसेच राहिले. परंतु ऐतिहासिक कथा या केवळ मनोरंजनाकरिता व बोधाकरिता होत्या. सहाजिकच प्रत्येक पिढी आपण ऐकलेल्या कथामध्ये आपल्या कल्पकतेप्रमाणे किंवा अनुभवाप्रमाणे कमीजास्त भर घालून त्या कथा पुढच्या पिढीच्या स्वाधीन करीत असे. या उपक्रमात मूळच्या ऐतिहासिक कथा किंवा घटना यांच्यात फार मोठे आणि चमत्कारिक बदल झाले.

या जुन्या इतिहासाचे उद्दिष्ट स्पष्ट होते, ते म्हणजे लोकांचे मनोरंजन करावयाचे, त्यांना आपल्या पूर्वजांचा परिचय अशा प्रकारे करुन द्यावयाचा की, त्या पूर्वजांविषयी त्यांना अभिमान वाटावा आणि त्यांची परंपरा टिकविण्याची इर्षा उत्पन्न व्हावी. या उद्दिष्टात शास्त्रीय दृष्टीकोन नव्हता. जे ऐतिहासिक प्रसंग निवडावयाचे आणि जो तपशील सांगावयाचा तो पाहण्यात येत नसे. त्यात अद्भूत घटना, काल्पनिक प्रसंग घुसडले जात असत. साध्यासुध्या पराक्रमाच्या प्रसंगांना भलतेच अतिरंजित स्वरुप देण्यात येत असे. तसेच कलात्मक हेतू साधण्यासाठी सद्गुणांचे आणि दुर्गुणांचे अवास्तव आणि अद्भूत चित्र रेखाटण्यात येई.

**2) इतिहास विषयाचा जुना अध्यापन दृष्टीकोनः**

जुना इतिहास शिकविण्याची पध्दतीही पारंपारिक अशीच होती. म्हणजेच केवळ वाचून दाखवून विषय शिकविला जाई किंवा केवळ निरसपणे, कंटाळवाणे तो सांगितला जाई. यामधून विद्यार्थ्यांना ऐतिहासिक बाबी पूर्णपणे आकलन व्हाव्या, कार्यकारणभाव व अर्थ लावता यावा ही अपेक्षा ठेवली जात नव्हती.

अशा ह्या निर्हेतूक किंवा अर्थहीन पाठांतर करणे, केवळ पुस्तक वाचन करणे, टिपणे देणे वगैरे क्रियांत अध्ययन प्रसंगांचा अभाव असल्याने या क्रिया विद्यार्थ्यांना अध्ययन अनुभूती प्राप्त करुन देण्यास असमर्थ असलेल्या आढळून येतात. थोडक्यात पूर्वीच्या काळी शिक्षककेंद्रित शिक्षण पध्दती असल्याने विद्यार्थ्यांचा विचार न करता केवळ रटाळ, प्रभावहीन अध्यापन केले जाई आणि विद्यार्थ्यांकडून ह्या ऐतिहासिक बाबी मुखोद्गत करुन घेतल्या जात असत.

**3) प्राचीन इतिहासातील दोषः**

जुन्या प्रकारच्या इतिहासात ठोकळमानाने तीन दोष आढळतात.

1) जुन्या इतिहासकारांनी इतिहासाला स्वतंत्र आणि स्वयंपूर्ण असे स्थान दिले नाही. त्यांचे इतिहास, वाङ्मय आणि कला असे अविभाज्य भाग होते.

2) जुना इतिहास सामान्यतः वैयक्तिक व उथळ वाटतो. यामध्ये राजे, राण्या, प्रधान, सेनापती इत्यादि बड्या लोकांचा इतिहास होता. सामान्य समाजाला व त्याच्या जीवनाला त्यांच्यात स्थान नव्हते. या इतिहासात राजकीय आणि लष्करी गोष्टीचाच विचार केला जात असे. समाजाच्या आर्थिक आणि सांस्कृतिक जीवनाची जुन्या इतिहासकारांनी फारशी दखल घेतली नाही.

3) जुन्या इतिहासाची दृष्टी भोंगळ व भाबडी होती. तिच्यात शास्त्रीय चिकित्सेचा अभाव होता. डोळे झाकून कसल्याही साधनांचा तपास न करता स्विकार आणि उपयोग केला जात असे. एवढेच नाही तर जुन्या इतिहास क्षेत्रात इतिहास आणि दंतकथा यांची भेसळ झाली होती. [5]

**4) विज्ञान युगाचा इतिहासावरील परिणामः**

एकोणिसाव्या शतकापासून विज्ञानयुगाचा प्रारंभ झाला आणि वेगवेगळया शास्त्रांमध्ये संशोधन सुरु झाले. सत्याकडे कटाक्षाने लक्ष पुरविण्यात येऊ लागले. सहाजिकच संशोधकांची दृष्टी ऐतिहासिक पुराव्याकडे वळली आणि त्या पुराव्यांची शास्त्रीय दृष्टीने आणि पध्दतीने चिकित्सा होऊ लागली. समकालीन अस्सल कागदपत्रे शोधण्यात आणि तपासण्यात वेगवेगळया राष्ट्रातील

दप्तरखान्यात काळजीपूर्वक संग्रह करण्यात येऊ लागले.

इतिहाससंशोधक राजवाडे नेहमी म्हणत, 'शंभर बखरीपेक्षा एक अस्सल चिटोरे अधिक मोलाचे असते.' 6.

शास्त्रीय पध्दतीने इतिहास लेखनाला सुरुवात जर्मनीत झाली. नीबूर हा जर्मन पंडित अधुनिक इतिहासशास्त्राचा जनक झाला. त्याने जुनी कागदपत्रे, जुने इतिहास आणि इतर साधने यांची काळजीपूर्वक तपासणी करुन रोमच्या प्राचीन प्रजासत्ताक राज्यांचा इतिहास सत्याच्या भूमिकेवरुन लिहिला. नीबूरच्या या नव्या इतिहास पध्दतीचा प्रभाव सर्व युरोपखंडात पडला. निरनिराळ्या देशातून व्यासंगी लोक जर्मनीच्या संशोधन केंद्रात इतिहासाचे नवे तंत्र शिकू लागले. इंग्लंडमध्ये स्टबज, गार्डिनर, मेटलॅंड आणि टाऊट या प्रसिध्द इतिहासकारांनी शास्त्रीय इतिहासाची परंपरा सुरु केली. इतर देशाप्रमाणेच आपल्या देशातसुध्दा आस्तेआस्ते का होईना परंतु शास्त्रीय ऐतिहासिक दृष्टी प्रस्थापित होत आहे. जुन्या कागदपत्रांचा कसोशीने शोध आणि संग्रह होत आहे. त्यांच्या तारखा निश्चित होत आहेत. या शास्त्रशुध्द साधनांचा उपयोग करुन भारतातील प्रदेशांचा शास्त्रीय इतिहास लिहिण्याचा उपक्रम सुरु झाला आहे.

थोडक्यात 19 व्या शतकानंतर हळूहळू शास्त्रीय चिकित्सेच्या आधारे ऐतिहासिक पुरावे शोधून त्यांची तपासणी, छाननी करुन योग्य त्या पुराव्यांच्या आधारेच इतिहास लिहिला गेला. सहाजिकच इतिहास शिक्षणाचा दृष्टीकोन व हेतू बदलला.

### 5) इतिहास शिक्षणाचा नवा दृष्टीकोनः

इतिहास शिक्षणाचा अधुनिक दृष्टीकोन खालील वाक्यावरुन स्पष्ट होतो.

भारतातील लोकशाही समाजवादास पोषक अशी मनोवृत्ती विद्यार्थ्यांत निर्माण व्हावी, गतीमान जीवनाची विचारमूल्ये आत्मसात करण्याची प्रेरणा विद्यार्थ्यांना मिळावी, त्यांचे जीवन प्रगत जीवनमूल्यांनी समृध्द व्हावे, त्यांची अस्मिता जागी व्हावी, त्यांच्या जीवनाची परिणती सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन समृध्द होण्यात व्हावी व त्यांच्या आत्मनिर्भरवृत्ती वाढीस

लागाव्यात, तसेच भूतकाळाच्या पार्श्वभूमीवर त्यांना वर्तमान काळातील घडामोडीचे आकलन व्हावे व त्याद्वारे भवितव्य उज्वल करण्याची जाण निर्माण व्हावी, त्यातून त्यांना निकोप राष्ट्रवाद, आंतरराष्ट्रीय सामंजस्य व सर्वधर्मसमभाववृत्ती याबद्‌दल प्रेरणा मिळावी व सुबुध्द, सुजाण नागरिक बनता यावे. [7]

त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना इतिहासातील आशय स्पष्टपणे समजावा, त्यांनी तो आत्मसात करावा, त्यांना तर्कशुध्दपणे व चिकित्सकपणे विचार करण्याची योग्यता प्राप्त व्हावी, त्यांना कांही प्रमाणात सामंजस्य व मर्मदृष्टी प्राप्त व्हावी, त्यांना इतिहास या विषया विषयी गोडी वाटावी, त्यांना योग्य अभिवृत्ती प्राप्त व्हाव्यात आणि त्यांना कांही किमान कौशल्ये संपादन करता यावीत हे प्रमुख उद्‌देश आहेत. [८]

ही सर्व उद्दिष्टे शासनमान्य आहेत. यावरुन स्पष्ट होते की, पूर्वीचा व्यक्तिनिष्ठ दृष्टीकोन बदललेला असून इतिहास अध्यापनाबाबतीत सामाजिक व नैतिक दृष्टीकोन स्विकारलेला आहे.

### 6) इतिहास अध्यापनासाठी विविध पध्दतींची आवश्यकता:

वरील उद्‌देश किंवा हेतू साध्य व्हावयाचे असतील तर केवळ तो आशय समजून चालणार नाही, तर तो कोणत्या पध्दतीने शिकविला जातो यालाही महत्व प्राप्त झाले आहे. विशिष्ट दृष्टीकोन तयार करावयाचा असेल तर विशिष्ट पध्दतीचा वापर करणे आवश्यक आहे. शिक्षकाला अध्यापन करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या वयोमानानुसार, अभिरुचीनुसार, कुवत व गरजेनुसार योग्य त्या पध्दतीने अध्यापन करण्याची कला त्याला अवगत असावी लागते. शिक्षक हा राष्ट्राचा शिल्पकार मानला जातो, त्यांचे अंगी कारागिरांचे सर्व गुण अपेक्षित असतात. आंतरराष्ट्रीय शिक्षण परिषदेत असे घोषित करण्यात आले होते की, "चांगले अध्यापन हे चांगल्या शिक्षकांवर अवलंबून असते, म्हणून शिक्षकांची गुणवत्ता सुधारणा हे आपले ध्येय असावे." ९. परंतु असे चांगले शिक्षक अथवा कलावंत हाताच्या बोटावर मोजण्याइतके देखील आढळून येत नाहीत, तेव्हा आपण जातिवंत शिक्षक आहोत अशा भ्रमात सर्वसामान्य

शिक्षकाने कदापी राहू नये.

शिक्षणप्रक्रियेतील अध्यापन पध्दतींना महत्व प्राप्त झाल्यानंतर अनेक पध्दती उदयास आल्या व कांही नष्टही पावल्या. त्यातील चांगली पध्दती कोणती असा प्रश्न पडल्यानंतर सामाजिक ध्येये, मूल्ये, उद्दिष्टे साध्य करण्यास जी पध्दती सहाय्यभूत ठरते, ती पध्दती चांगली होय. तसेच इतिहास हे एक सामाजिक शास्त्र असल्याने कोणतीही पध्दत सर्व परिस्थितीत सर्वोत्कृष्ट, संपूर्णतः निर्दोष व रामबाण ठरु शकणार नाही. तर वेगवेगळया घटकांनुसार, वेगवेगळया विद्यार्थी स्तरानुसार, वेगवेगळया पध्दती उपयोगी ठरतात. म्हणून शिक्षकाला निरनिराळया पध्दतींचे ज्ञान असणे गरजेचे आहे.

**(क) इतिहास अध्यापनाच्या विविध पध्दती:**

इतिहास अध्यापनाच्या विविध पध्दती आहेत. त्या खालीलप्रमाणे-

1) कथन पध्दती - Narration Method.
2) चर्चा पध्दती - Discussion Method.
3) आधार पध्दती - Source Method.
4) स्वाध्याय पध्दती - Dalton Plan.
5) प्रकल्प पध्दती - Project Method.
6) क्रमिक पुस्तक पध्दती - Text Book Method.
7) समस्या पध्दती - Problem Method.
8) समकेंद्र पध्दती - Concentric Method.
9) विषयानुसारी पध्दती - Topical Method.
10) कथाकथन पध्दती - Story telling Method.

(वरील पध्दतीविषयी थोडक्यात माहिती प्रकरण क्र. 3 मध्ये दिलेली आहे.)

**ड) कथाकथन पध्दती:** Story Telling Method.

इतिहासाच्या विविध अध्यापन पध्दतीपैकी कथाकथन ही एक पध्दती आहे.

माध्यमिक स्तरावर वापरात असणाऱ्या कथन पध्दतीशी संबंधित असणारी ही कथाकथन पध्दती आहे. कनिष्ठ माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना ती अत्यंत उपयुक्त ठरते. कारण कथाकथनातील हावभाव, हालचाल, आवाजातील चढउतार इत्यादि तंत्रांचा योग्य तो वापर केल्यास विद्यार्थ्यांवर त्याचा उपयुक्त परिणाम साधला जातो.

> Story - teller uses eyes, hands and body in expressing ideas, holds the child's mind more completely. Right listening means good memory and so through story - telling a child has his intellectual horizon marvellously widened. He gains not only the actual facts of the stories, but new thoughts, new phrases, new words, new ideas of form, colour, sound and action. He acquires a sense of literary form and unconsciously a taste for what is well-expressed. [10]

( कथाकथन पध्दतीविषयी सविस्तर माहिती प्रकरण क्र. 3 मध्ये दिलेली आहे.)

**1.2 संशोधनाची गरज:**

कोणत्याही क्षेत्रातील समस्या, अडचणी, त्रुटी संशोधनाद्वारे सोडविल्या तर त्याचे स्वरुप स्पष्ट होते. शिक्षण क्षेत्रामध्ये सुध्दा अध्ययन अध्यापनाबाबतीत विविध समस्या आहेत. त्या समस्यांचे निराकरण संशोधनाद्वारे केले तर शिक्षण प्रक्रिया अधिक प्रगतीशील होण्यास मदत होईल.

"Research has proved to be an essential and powerful tools in leading man towards progress. Research shows us the way in our difficulties. It opens new avenues and provides to us better alternatives." 11

प्रस्तुत संशोधन इतिहास विषयातील कथाकथन पध्दती अधिक परिणामकारक होण्याच्या दृष्टीकोनातून हाती घेतले आहे. कारण कनिष्ठ माध्यमिक स्तरावर कथाकथन पध्दतीचा योग्य प्रकारे वापर व्हावा असे अभिप्रेत आहे. या स्तरावरील विद्यार्थ्यांना ऐतिहासिक घटना गोष्टीरुपाने सांगितल्याने त्यातील आशय ते सहज आत्मसात करु शकतात. त्या विषयाबद्दल त्यांना गोडी निर्माण होऊ शकते. त्यांचा भावनिक, भाषिक विकास होऊ शकतो. त्याचप्रमाणे सध्याच्या पुर्नरचित अभ्यासक्रमाची मान्य केलेली उद्दिष्टे सफल होण्यासाठीही याच पध्दतीचा उपयोग होऊ शकतो, असे पुर्नरचित अभ्यासक्रमाच्या मसुद्यातही निर्देशित केले आहे.

परंतु सध्या या कथाकथन पध्दतीचा योग्य प्रकारे वापर केला जात नाही. पध्दतीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते. जास्त कष्ट करण्याची शिक्षकांची तयारी नसते. विद्यार्थ्यांच्या भवितव्याविषयी विचार, चिंता, हित, व्यक्तीविकास तसेच त्यांचा सामाजिक विकास याबाबत विचार केला जात नाही. त्यामुळे धोपटमार्गाने अध्यापन केले जाते. सहाजिकच यातून उच्च ध्येये साध्य होत नाहीत. इतिहासाचे अध्यापन हेतूहीन, रटाळ बनते. त्यामुळे पुढील माध्यमिक स्तरावरील इतिहासाच्या अध्यापनात विद्यार्थ्यांना रस वाटत नाही.

प्रस्तुत संशोधिका इतिहास विषयाची पदव्युत्तर असून सध्या ती इतिहास विषयाचे अध्यापन करते. इतिहास हा तिचा आवडीचा विषय आहे.

सध्या वापरात असलेल्या कथाकथन पध्दतीचा वापर कमी प्रमाणात होतो. तसेच तो अधिक परिणामकारकरित्या होत नसल्याचे आढळते.

खरे तर कथाकथन पध्दतीने मुले अधिक आकर्षित झाली पाहिजेत. त्यांचेमध्ये विषयाची गोडी निर्माण व्हावयास हवी. हे कशामुळे घडते याची कारणमिमांसा आणि कथाकथन पध्दती परिणामकारक होण्यासाठी कोणत्या बाबींचा अवलंब आवश्यक आहे हे पहाण्याची गरज वाटते. म्हणून संशोधिकेचे ह्या अभ्यास विषयाकडे लक्ष वेधले गेले आहे.

**1.3 समस्येचे शब्दांकनः**

प्रस्तुत समस्येचे शब्दांकन खालीलप्रमाणे केले आहे.

" कनिष्ठ माध्यमिक स्तरावरील इतिहास अध्यापनातील कथाकथन पध्दती अधिक परिणामकारक होण्याच्या दृष्टीने केलेला अभ्यास. "

प्रस्तुत संशोधनाच्या विधानात वापरलेल्या महत्वाच्या विविध संज्ञांचे स्पष्टीकरण पुढील प्रमाणे केले आहे.

**कनिष्ठ माध्यमिक स्तरः**

हायस्कूलशी संलग्नीत असलेल्या कनिष्ठ माध्यमिक स्तर या संज्ञेमध्ये इयत्ता 5 वी, इयत्ता 6 वी व इयत्ता 7 वी या वर्गांचा समावेश होतो. कथाकथन पध्दतीचा वापर या तिन्ही वर्गांसाठी केला जात असला तरी जास्तीत जास्त इयत्ता 5 वी च्या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी कथाकथन पध्दतीचा वापर केला जातो. प्रस्तुत संशोधनात कथाकथन पध्दती अधिक परिणामकारक होण्याच्या दृष्टीने करावयाच्या अभ्यासासाठी प्रस्तुत संशोधनापुरता कनिष्ठ माध्यमिक स्तर म्हणजे इयत्ता 5 वी चा वर्ग एवढ्यापुरता मर्यादित आहे.

**इतिहास अध्यापनः**

इतिहास अध्यापन म्हणजे कनिष्ठ माध्यमिक स्तरावर इयत्ता 5 वी च्या अभ्यासक्रमातील समाजशास्त्र असा अभ्यासला जाणारा विषय आहे. त्यापैकी इतिहास हा एक विषय असून शिक्षकांकडून इतिहास विषयातील सांगितली गेलेली माहिती या अर्थाने "इतिहास अध्यापन" हा शब्द वापरला आहे.

**कथाकथन पध्दती:**

कनिष्ठ माध्यमिक स्तरावर वापरण्यात येणाऱ्या इतिहास अध्यापनाच्या पध्दतीपैकी कथाकथन ही एक पध्दती आहे.

कोणतीही बाब वा घटना कथेच्या माध्यमाद्वारे कथन करणे म्हणजे कथाकथन पध्दती होय.

प्राथमिक स्तरावर व कनिष्ठ माध्यमिक स्तरावर या पध्दतीला महत्वाचे स्थान आहे. या पध्दतीमुळे मुलांचा भावनिक, भाषिक व बौध्दिक विकास होतो. त्यामुळे मुले नवीन शब्दसंपत्ती व नवीन कल्पना शिकतात. ती बोलण्याच्या अचूक पध्दती आत्मसात करतात. त्यांच्या ठिकाणी वाचनाची तत्परता ( वाचनक्षमता ) निर्माण होते आणि या यशस्वी कथाकथनासाठी मुलांचे वय, अभिरुची यांचा विचार करुन कथेची योग्य निवड, प्रसंगाचे वास्तव दिग्दर्शन, नैसर्गिक प्रगटीकरण, चांगला आवाज आणि योग्य तो परिणाम साधण्यासाठी योग्य त्या जागी त्या शब्दावर / वाक्यावर जोर देणे इ. बाबी आवश्यक आहेत.

**अधिक परिणामकारकता:**

प्रस्तुत संशोधनामध्ये इतिहास विषयाच्या अध्यापनाची अधिक परिणामकारकता खालील बाबीत साध्य होते असे प्रस्तुत संशोधिकेने गृहीत धरलेले आहे.

1) इतिहास विषयाची पुनर्रचित अभ्यासक्रमानुसार निर्देशित केलेली उद्दिष्टे साध्य होणे.

2) इतिहास विषयाची आवड निर्माण होणे.

3) इतिहास विषयाचे आकलन होणे.

**1.4 संशोधन विषयाचे महत्व:**

शालेय अभ्यासक्रमात इतिहास हा महत्वाचा विषय आहे. इतिहासाच्या अभ्यासक्रमाची सुरुवात इयत्ता 3 री पासून करण्यात आली आहे, तथापि इयत्ता 3 री व 4 थी चा इतिहासाचा अभ्यासक्रम औपचारिक स्वरुपाचा नाही. या अभ्यासक्रमाचे स्वरुप

प्रामुख्याने स्फूर्तीप्रधान व प्रेरणात्मक आहे. भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठी व नवभारताच्या निर्मितीसाठी ज्यांनी महान कामगिरी बजावली अशा कांही थोर व्यक्तींचा अंतर्भाव इयत्ता 3 री च्या अभ्यासक्रमात केला आहे. अभ्यासक्रमातील कांही भागांचे अध्ययन करण्यासाठी परिसराच्या माध्यमाचा उपयोग व्हावा या दृष्टीने कांही थोर समाजसुधारकांची निवड प्रामुख्याने महाराष्ट्राच्या संदर्भात केली आहे. इयत्ता 3 री मध्ये एकूण फक्त 15 व्यक्तींच्या कथा अभ्यासावयाच्या आहेत. इयत्ता 4 थी मध्ये गोष्टीरुप शिवकालाचा अंतर्भाव केला आहे. स्वराज्य स्थापनेसाठी शिवरायांनी केलेले कार्य हे तत्कालीन अन्यायी व जुलमी सत्तांविरुध्द शिवराय व रयत यांनी दिलेला एक प्रेरक लढा आहे. शिवकालातील या प्रेरक लढ्यांचा गोष्टीरुप इतिहास अंतर्भूत केला आहे. इयत्ता 5 वी पासून इतिहासाच्या औपचारिक अभ्यासक्रमास सुरुवात केली आहे. यामध्ये प्राचीन काळापासून सातव्या शतकापर्यंतचा भारताचा ठळक इतिहास विद्यार्थ्यांना माहित व्हावा या हेतूने भारत–प्राचीन संस्कृती, धर्म या कालखंडातील उल्लेखनीय राजे, त्यांचे विशेष, कांही निवडक थोर व्यक्ती, त्यांचे कार्य इत्यादींचा अंतर्भाव इयत्ता 5 वी मध्ये केला आहे. इयत्ता 5 वी मधील या कालखंडाचे कालक्रमानुसार अध्ययन अपेक्षित नाही तर फक्त निर्देशित घटकांचे गोष्टीरुप अध्ययन अपेक्षित आहे. [12]

इयत्ता 6 वी मध्ये सन 712 ते 1818 या कालखंडाचा ठळक इतिहास अंतर्भूत आहे. भारतावर झालेली परकीय आक्रमणे, मुघलकालीन भारत, मराठी सत्तेचा उदयास्त या संदर्भात तत्कालीन सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक व आर्थिक या सर्व आघाड्यांवरील ठळक इतिहासाचे अध्ययन व्हावे अशी अपेक्षा आहे. इयत्ता 7 वी मध्ये भारताच्या स्वातंत्र्याचा इतिहास अंतर्भूत आहे. नवीन अभ्यासक्रम केवळ पुस्तकी स्वरुपाचा नाही. यातील कांही भागांच्या अध्ययनासाठी पाठ्यपुस्तके जरुर आवश्यक आहेत पण कांही भाग निवडक अशा उपक्रमांच्या सहाय्याने अभ्यासला जावा अशीही अपेक्षा आहे.

प्रस्तुत संशोधन इयत्ता 5 वी च्या वर्गासाठी मर्यादित आहे. या स्तरांवर सुधारित

अभ्यासक्रमाच्या पुनर्रचित मसुद्यानुसार निर्देशित घटकांचे कथारुप अध्ययन अपेक्षित आहे. म्हणजेच मुलांना इतिहासातील वेचक प्रसंग गोष्टीरुपाने सांगितले पाहिजेत. त्या प्रसंग कथेत पराक्रम, शौर्य, जिद्द, देशभक्ती, स्वातंत्र्यप्रेम, वीरश्री, स्वामिनिष्ठा असे जे जे गुण असतील ते भेटतील. कोवळ्या मनावर हृया देशप्रेमाचे संस्कार करतील, राष्ट्रीयत्वाचे स्फुरण देतील, देशाचा गौरवशाली इतिहास ऐकता ऐकताच त्या देशाचा मी नागरिक आहे, मी देशासाठी तनमनाने झटले पाहिजे, देशाच्या हितामध्येच माझेही हित सामावलेले आहे, प्रसंगी प्राणाचीही किंमत मोजून देशाचे रक्षण केले पाहिजे, राष्ट्रगीताचा, राष्ट्रध्वजाचा मान राखला पाहिजे, त्याविषयी आदरभावना बाळगली पाहिजे, हेही त्यांना पटवले पाहिजे. अशा त-हेचे राष्ट्रीय चारित्र्य मुलांमध्ये निर्माण होण्यासाठीच इतिहासातील गोष्टींचा उपयोग करुन घेतला पाहिजे. नाहीतर विपरीत परिणाम होण्याचीही शक्यता आहे. इतिहासात दोन धर्मांचे, दोन जातींचे राजे राजकाजावरुन लढणार, एकमेकांवर हल्ले प्रतिहल्ले चढवणार, शह - काटशह, डाव - प्रतिडाव हे सगळे प्रकार यशःसिध्दीसाठी करणार, तेव्हा तेथील एकाचाच पक्ष घेऊन दुस-याच्या जातीधर्माची निंदा - टवाळी करुन द्वेष, मत्सर उत्पन्न होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. दोन जमातीमध्ये पिढ्यान्‌पिढ्यांची वैरे निर्माण झाली आहेत. त्याचे चटके राष्ट्राला आजही सोसावे लागत आहेत. तेव्हा एखाद्या घटनेवर फाजील भर देऊन एखाद्या धर्माबद्दल द्वेषभावना निर्माण करण्याचा प्रयत्न न कळत सुध्दा होऊ नये. ऐतिहासिक गोष्टीतून शौर्य, पराक्रम, देशभक्ती, इत्यादी सद्‌गुण अंगी बाणावेत. आपल्या देशाचा गतकाळ कळावा, एवढ्याच दृष्टीने त्यांचा उपयोग व्हावा आणि मुलांची मने इतिहासातच किंवा भूतकाळातच सदैव रमणार नाहीत याचीही दक्षता घ्यावी. त्यांच्या हाताशी वर्तमान आणि डोळ्यांपुढे भविष्यकाळ आहे. इतिहास नुसता ऐकायचा, वाचायचा नसून तो घडवावयाचा आहे याची जाण त्यांना करुन द्यावी लागते.

वरील बाबी योग्य प्रकारे साध्य होण्यासाठी कनिष्ठ माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी कथा स्वरुपात अध्ययन अपेक्षित आहे.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR
SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

सबब कथाकथन पध्दती ही अधिक परिणामकारक व्हावी, सुधारित अभ्यासक्रमानुसार ठरविलेली कनिष्ठ माध्यमिक स्तरावरील उद्दिष्टे सफल होण्यासाठी हातभार लागावा आणि त्याचा कनिष्ठ माध्यमिक स्तरावर इतिहास अध्यापन करणाऱ्या शिक्षकांना उपयोग व्हावा या हेतूने प्रस्तुत संशोधन विषयाची निवड केली आहे.

**1.5 संशोधनाची उद्दिष्टे:**

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

1) इतिहास अध्यापनाच्या कथाकथन पध्दतीचा चिकित्सापूर्ण अभ्यास करणे.

2) अशा तऱ्हेचा अभ्यास करुन ही पध्दती अधिक परिणामकारक होण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

**1.6 गृहीत कृत्य:**

प्रस्तुत संशोधनात पुढील गृहीत कृत्य मानले आहे.

1) पारंपारिक व कथाकथन पध्दतीने शिकविल्यास इतिहास प्राविण्यात फरक पडणार नाही.

**1.7 संशोधनाची व्याप्ती व मर्यादा:**

व्याप्ती:

1) प्रस्तुत संशोधन कराड शहरातील यशवंत हायस्कूलपुरते मर्यादीत आहे.

2) प्रस्तुत संशोधन यशवंत हायस्कूलमधील इयत्ता 5 वी या कनिष्ठ वर्गापुरते मर्यादीत आहे.

3) हे संशोधन इयत्ता 5 वी या कनिष्ठ वर्गाच्या इतिहास अध्यापनाविषयी केले गेले आहे.

मर्यादा:

1) प्रस्तुत संशोधनात इयत्ता 5 वी च्या वर्गातील 25 - 25 विद्यार्थ्यांची निवड केली आहे.

2) प्रस्तुत संशोधनात विद्यार्थी विभागणी बुध्दीमापन कसोटीवर केलेली नसून इतिहास विषय ज्ञानाच्या चाचणीवर केलेली आहे.

3) संशोधिकेने वापरलेल्या संपादन चाचण्या ह्या प्रमाणित केलेल्या चाचण्या नसून त्या Teacher made test ( शिक्षकांनी तयार केलेल्या आहेत.)

### 1.8 संशोधन पध्दती:

प्रस्तुत संशोधनात कथाकथन पध्दती अधिक परिणामकारक होण्याच्या दृष्टीने करावयाच्या संशोधनासाठी प्रायोगिक पध्दतीचा अवलंब केलेला आहे. या संशोधनासाठी कराड शहरातील यशवंत हायस्कूलमधील इयत्ता 5 वी च्या वर्गाची निवड केली आहे. त्यातील दोन समतूल्य गटांची निवड करण्यासाठी इतिहास विषयज्ञानाची चाचणी दिली आहे. हे दोन गट अनुक्रमे प्रायोगिक व नियंत्रित असे राहिले. नियंत्रित गटावर पारंपारिक पध्दतीचा व प्रायोगिक गटावर कथाकथन पध्दतीचा अवलंब केला गेला आहे. कथाकथन पध्दतीची परिणामकारकता अजमावण्यासाठी सलग पध्दतीने तीन महिने अध्यापन कार्य केले आहे. द्वितीय सत्रातील इतिहास विषयाच्या सर्व पाठ्यांश घटकांची निवड प्रायोगिक अध्यापन कार्यासाठी केली आहे. अध्यापनाचे वेळीच दर चार घटकानंतर एक अशा बारा घटकांवर एकूण तीन संपादन चाचण्या दिल्या गेल्या आहेत. संशोधन अभ्यासासाठी जे दोन समतूल्य गट तयार केले होते, ते प्रत्येकी 25 विद्यार्थ्यांचे होते आणि त्यांना स्वतंत्ररित्या न शिकविता ते विद्यार्थी ज्या वर्गात नेहमी बसत असत त्या वर्गाला अनुक्रमे कथाकथन व पारंपारिक पध्दतीने अध्यापन केले. अध्यापन चालू असतांना प्रत्येक पाठ्यांश घटकाच्या अध्यापन निरीक्षणासाठी दहा प्रशिक्षित अनुभवी इतिहास विषय शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली. हे निरीक्षक प्रायोगिक गटाच्या कथाकथन पध्दतीच्या अध्यापनाचे निरीक्षण करतील अशी योजना आखली होती. त्यासाठी त्यांना कथाकथन पध्दतीच्या निकषांचा तक्ता प्रत्येक पाठ्यांश घटकाच्या पाठाच्या निरीक्षणासाठी दिला गेला होता.

**१.9 प्रकरणीकरण:**

अशा प्रकारे संकलीत केलेल्या सामग्रीचे वर्गीकरण व पृथ:करण करुन तसेच अन्वयार्थ लावून त्यावरील आधारीत निष्कर्ष तद्अनुषंगाने केलेल्या शिफारशी पुढे निर्देशित केलेल्या प्रकरणामध्ये मांडण्यात आलेल्या आहेत.

**प्रकरण पहिले : प्रास्ताविक:**

या प्रकरणामध्ये प्रस्तुत संशोधन अभ्यासाची गरज का वाटली याचा उहापोह केलेला आहे. तसेच संशोधन समस्येचे शब्दांकन करुन संशोधनाचे महत्व, त्याची मर्यादा व व्याप्ती आणि संशोधनाची उद्दिष्टे, गृहीतकृत्य स्पष्ट केले आहे. थोडक्यात हे प्रकरण संशोधनाची पार्श्वभूमी स्पष्ट करते.

**प्रकरण दुसरे: संशोधन विषयाशी संबंधित संशोधीत साहित्याचा मागोवा:**

प्रस्तुत प्रकरणात संशोधन विषयाशी संबंधित संशोधीत साहित्याचा आढावा घेण्यात आला आहे. हा आढावा सैध्दान्तिक पार्श्वभूमी म्हणून उपयुक्त आहेच, परंतु त्यापेक्षा संशोधन विषयाशी संबंधित आतापर्यंत या क्षेत्रात कोणते संशोधन झाले आहे, कोणत्या प्रकारची सामग्री गोळा करण्यात आली, त्यासाठी कोणती साधने वापरण्यात आली, गोळा केलेल्या सामग्रीचे कशाप्रकारे वर्गीकरण, विश्लेषण करण्यात आले, अन्वयार्थ कसा लावण्यात आला आणि कोणते निष्कर्ष काढण्यात आले, तसेच कोणत्या शिफारशी करण्यात आल्या याविषयी उहापोह केलेला आहे. त्यामुळे हे प्रकरण खुद्द संशोधिकेला देखील प्रस्तुत संशोधन कशाप्रकारे करावे याविषयी मार्गदर्शनपर ठरले आहे.

**प्रकरण तिसरे: कथाकथन पध्दती:**

या प्रकरणामध्ये इतिहासाच्या अध्यापन पध्दतींची उपयुक्तता स्पष्ट करुन इतिहासाच्या विविध अध्यापन पध्दती कोणत्या याचा थोडक्यात आढावा घेऊन, त्यातील कथाकथन पध्दतीची उपयुक्तता स्पष्ट करुन ती पध्दती अधिक परिणामकारक होण्याच्या दृष्टीने तिची आवश्यक तंत्रे कोणती आणि त्या तंत्रांचा वापर कसा केला जावा, त्याचप्रमाणे कथाकथन पध्दतीचा प्रारंभ व शेवट कसा करावा याविषयी उहापोह केला गेला आहे.

**प्रकरण चौथे: संशोधन पध्दती:**

या प्रकरणामध्ये शोध कार्यासाठी कोणत्या संशोधन पध्दतीचा उपयोग केला गेला, त्यासाठी नमुना निवड कशी केली, अध्यापन साहित्याची निर्मिती व अध्यापन कालावधी किती ठरविला आणि प्रत्यक्ष शोधकार्य कशा प्रकारे पार पाडले, मूल्यमापनासाठी कोणती साधने वापरली गेली याची विस्तृत माहिती देण्यात आलेली आहे.

**प्रकरण पाचवे: माहितीचे संख्याशास्त्रीय वर्गीकरण व विश्लेषण:**

या प्रकरणामध्ये मूल्यमापन साधनांद्वारे मिळालेल्या आधारसामग्रीचे वर्गीकरण करुन विश्लेषण करण्यात आल्यानंतर त्याचा अन्वयार्थ लावलेला आहे. प्रयोगाअंती कथाकथन पध्दतीविषयी सुचलेले विचार मांडले आहेत.

**प्रकरण सहावे: निष्कर्ष व शिफारशी:**

या प्रकरणामध्ये मूल्यमापन साधनांद्वारे मिळालेल्या आधारसामग्रीचे वर्गीकरण व विश्लेषण करुन अन्वयार्थ लावल्यानंतर त्या आधारे कोणते निष्कर्ष निघतात ते स्पष्ट करून त्यावर आधारीत शिफारशी सुचविण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे प्रस्तुत संशोधन करतांना अभ्यासकाला जाणवलेल्या आणि अशा प्रकारच्या संशोधनासाठी उपयुक्त ठरणाऱ्या कांही समस्यांचा पुढील संशोधनासाठी निर्देश केला आहे.

**1.10 समारोप:**

प्रस्तुत संशोधनाचा विषय ' कनिष्ठ माध्यमिक स्तरावरील इतिहास अध्यापनातील कथाकथन पध्दती अधिक परिणामकारक होण्याच्या दृष्टीने केलेला अभ्यास. ' असा असल्याने विषयाची सुरुवात इतिहास विषयाचा जुना दृष्टीकोन, जुनी अध्यापन पध्दती, त्यानंतर शास्त्रीय दृष्टीकोनाचा किंवा वैज्ञानिक दृष्टीकोनाचा इतिहास दृष्टीकोनावर झालेल्या बदलामुळे नवा दृष्टीकोन कसा प्राप्त झाला, या बाबीचा उहापोह होणे गरजेचे असल्याने या प्रकरणात वरील बाबींचे विवेचन केले आहे. तसेच संबंधित संशोधनात इतिहास विषयातील अध्यापन पध्दतीपैकी कथाकथन पध्दतीसंबंधी असल्याने अध्यापनाच्या इतर पध्दतींचा उल्लेख आणि त्यातील कथाकथन पध्दती म्हणजे काय याचेही वर्णन आले आहे.

त्याचप्रमाणे संशोधनाची गरज का भासली, समस्येचे थोडक्यात स्पष्ट शब्दात शब्दांकन, संशोधन विषयाचे महत्व, त्याची उद्दिष्टे, गृहीतकृत्य, संशोधनाची नेमकी व्याप्ती व मर्यादा इत्यादी बाबी या प्रकरणात दिल्या आहेत. शेवटी प्रकरणीकरण दिले आहे.

# संदर्भ सूची


1) The Indian Year Book of Education Second Year Book,( N.C.E.R.T New Dehi ), 1964, p.125

2) घाटे, वि.द.: इतिहास शास्त्र आणि कला, (देशमुख प्रकाशन 22, कसबा पुणे2), पृ.6. (1958)

3) तिवारी, सी.म.: इतिहास अध्यापन पध्दती, (नूतन प्रकाशन,पुणे 411 030),पृ.111. (1987)

4) घाटे, वि.द.: इतिहास शास्त्र आणि कला, (देशमुख प्रकाशन 22, कसबा पुणे2), पृ.7. (1958)

5) तिवारी, सी.म.: इतिहास अध्यापन पध्दती, (नूतन प्रकाशन पुणे411 031), पृ.116. (1987)

6) घाटे, वि.द.: इतिहास शास्त्र आणि कला, (देशमुख प्रकाशन 22,कसबा पुणे2), पृ.11. (1958)

7) महाराष्ट राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे 411 010, इतिहास इयत्ता 10 वी प्रस्तावना.

8) पत्की, श्री.मा.: इतिहास अध्यापन पध्दती व तंत्र, (मिलिंद प्रकाशन, औरंगाबाद), पृ.52. (1987)

9) Khanna, S.D.: Current Problems of Indian Education, (Delhi House Book Seuers and pub,Delhi,1985),P.257.

10) The Encyclopaedia and dictionary of Education, Volume IV, (Edited by Professor Foster Watsan, Printed by Isoac Pitman and Sons, Ltd, England 1922), P.1596.

11) Sidhu, K.S.: Methodology of Research in Education (Sterling Publishers Private Limited, New Delhi, 110 016), P.3 (1985)

12) इयत्ता । ते 7 च्या सुधारित अभ्यासक्रमाचा पुनर्रचित मसुदा, (शिक्षणशास्त्र संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे, 411 030 ), पृ. 117. (१९७८)

-------